# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

### परिपत्रक क्र. १७१ / २०१६

**विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मधील आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे दि. ३१ ऑक्टोबर २०१६ पूर्वी विद्यापीठास पाठविण्यात यावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना, खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) सर्व विद्याशखेतील सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठ हिस्सा शेवटी दिलेल्या शुल्क तक्त्यानुसार पाठवावा.

२) ऑनलाईन प्रो–रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्साची ऑनलाईन प्रक्रिया बी.सी.यु. डी. पोर्टल अंतर्गत दिली आहे. bcud login मध्ये 'प्रो–रेटा ऑनलाईन' हि लिंक वापरुन सदरची माहिती भरावयाची आहे.

३) ऑनलाईन पध्दतीमध्ये सर्व विभागांसाठी एकत्रित चलन काढावयाचे आहे. चलनाची विद्यापीठ प्रत जमा करताना मूळ प्रत (बॅंक शिक्का) असलेली शैक्षणिक प्रवेश विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह शैक्षणिक प्रवेश विभाग येथे जमा करावी. तसेच या शिक्का असलेल्या चलनाच्या छायांकित प्रती विद्यापीठ क्रीडा मंडळ व विद्यार्थी कल्याण मंडळ येथे त्या त्या विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह जमा कराव्यात. चलन करताना शक्यतो सर्व अभ्यासक्रमाचे मिळून एकच चलन काढावे. प्रत्येक अभ्यासक्रमाचे वेगवेगळे चलन काढण्याची आवश्यकता नाही.

–२

विशेष सूचना :

१) विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रमांक PGS/542 dt. 17.2.2011 नुसार विद्यापीठास पाठवायचा आहे.

२) व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क व्यावसायिक दरानुसार पाठवावे.

३) परदेशी/सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्र. आयएससी/१०५० व १०५०—ए, दि.९ जून, २००८ नुसार पाठवावा.

४) नियमित प्रवेशित प्रती विद्यार्थ्यांमागे रु. ८/— प्रमाणे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचा (उदा. पुणे शहर/अहमदनगर/पुणे जिल्हा/नाशिक) देय असलेला प्रो—रेटा संबंधित विभागीय समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रो—रेटा न भरल्यास आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेऊ दिला जाणार नाही. तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाने प्रो—रेटा/शुल्काबाबत घेतलेल्या निर्णयांच्या बदलांची नोंद महाविद्यालयांना संलग्नित संस्थांना कळविण्यात येईल.

५) मागील वर्षाचा वरील निधीतील हिस्सा पाठविला नसल्यास तो संबधित विभागाकडे धनाकर्षासह स्वतंत्रपणे पाठवावा.

शुल्काचा तक्ता

| अ. क्र. | विभाग | निधी/ शुल्काचे शिर्षक | अभ्यासक्रम | विद्यापीठ हिस्सा रु.मध्ये | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | व्यावसायिक अभ्यासक्रम | अ—व्यावसायिक अभ्यासक्रम |
| १ | विद्यार्थी कल्याण मंडळ | विद्यार्थी कल्याण निधी | पदवी व पदव्यूत्तर | २० | २० |
| | | विद्यार्थी सुरक्षा विमा निधी | पदवी व पदव्यूत्तर | १० | १० |
| | | आपत्कालीन निधी | पदवी व पदव्यूत्तर | १० | १० |
| २ | राष्ट्रीय सेवा योजना | रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क | पदवी व पदव्यूत्तर | १० | १० |
| ३ | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ जिमखाना शुल्क | पदवी व पदव्यूत्तर | २० | २० |
| | | अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) | पदवी व पदव्यूत्तर | २० | २० |
| | | कॉर्पस फंड | पदवी व पदव्यूत्तर | ०४ | ०४ |
| ४ | शैक्षणिक प्रवेश विभाग | नोंदणी शुल्क | पदवी व पदव्यूत्तर | २५ | २५ |
| | | संगणक शुल्क | पदवी व पदव्यूत्तर | २० | ०५ |
| | | विकास निधी | पदवी व पदव्यूत्तर | ५० | २५ |
| ५ | आरोग्य केंद्र | विद्यार्थी आरोग्य सेवा योजना | पदवी | २० | २० |

वरील सूचना विचारात घेऊन निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

**संचालक,**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : म.व.वि.वि.मं./२०१६–१७/२३५
दिनांक : २९/०९/२०१६

प्रति,

१. मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये.

२. मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असेलेल्या सर्व मान्यताप्राप्त संस्था.

प्रत :

मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे — ४११ ००७.